# मराठी (कुमारभारती)

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 4 थी

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) आप्पांच्या मते, चिंतेमुळे फक्त कपाळावरच्या आठ्या वाढतात.

(ii) शिपाईसुद्धा कौतुकास पात्र ठरतो; जेव्हा तो चांगलं काम करतो.

**(2)** **उताऱ्यात आलेले शाळेतील महत्त्वाचे घटक**

- मुख्याध्यापक
- शिक्षक
- विद्यार्थी
- शिपाई

**(3)** सरधोपटपणे जीवनाचे ध्येय ठरवू नये, हे आप्पांचे म्हणणे मला खूपच पटते. कोणतेही काम निवडायला हरकत नाही. पण ते आवडीने पार पाडायचे, हे मी ठरवूनच टाकले आहे. मी एक वेगळेच ध्येय स्वत:साठी ठरवून टाकले आहे. मी खूप अभ्यास करणार आहे. वर्गात कोणताही विषय उत्तम रितीने कसा शिकवायचा, याचा शोध घेणार आहे. त्याचा शाळेशाळेत जाऊन प्रसार करणार आहे. आधी मला हा विचार सुचला, तेव्हा खूप भीती वाटली होती की माझे कोण ऐकेल? कोण समजून घेईल? पण आप्पांनी सांगितले तसे मी करणार आहे. मनापासून, जीव ओतून मी ठरवलेले काम करणार आहे. मला खात्री आहे की मी यशस्वी होईनच.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) गॅलरीत खांबाला लावलेला – आरसा

(ii) या मजल्यावर लेखकांचा रहिवास – तिसरा

(iii) देखाव्याचे मुके शब्द – नमस्ते !

(iv) कारंज्याप्रमाणे उडणाऱ्या – कल्पना

**(2)** **तिसऱ्या मजल्यावरून पावसाळ्यात लेखकाला दिसलेली दृश्ये**

- भिंतीच्या व कौलारांच्या उंचसखल व उभ्याआडव्या रांगा समोर दिसतात.
- पावसाळ्यात दिशा धूसर बनतात.
- कधी कधी पाऊस रिमझिमतो.
- कधी कधी पाऊस धोधो कोसळतो.

**(3)** प्रत्येकाची विचार करण्याची सवय व वेळ स्वतंत्र असते, यात शंकाच नाही. कोणाला कोणत्या वेळेला नवनवीन विचार सुचतील किंवा नवनवीन कल्पना स्फुरतील, हे सांगता येणे तसे कठीणच आहे. आमच्या कॉलनीत एक कवी राहतो. हा कवी रोज सकाळी जेथे माणसांची वर्दळ नसते, तिथे येरझारा घालत फिरत राहतो. असे चालता चालता त्याला कवितेच्या ओळी सुचतात.

माझ्या वर्गात माझा एक मित्र आहे. तो अभ्यास करताना मोबाइलवर चित्रपट गीते लावून ठेवतो. त्याच्या मते, गाणी चालू असताना उत्तरे सुचतात, निबंध चांगला लिहिता येतो, गणिते सहज सोडवता येतात. तो सांगतो की, गाणी चालू असताना त्याचे मन एकाग्र होते. 'काळे केस' या पाठाचे लेखक ना. सी. फडके यांना दाढी करता करता लेखन सुचत असे.

या बाबतीत काही नियम सांगता येणे केवळ अशक्य आहे. प्रत्येकाची सवय वेगळी असते. स्वत:चे मन मुक्त व आनंदी होण्याची वेळसुद्धा वेगवेगळी असते. मन मुक्त व आनंदी असते तेव्हा विचार सुचतात, कल्पना सुचते. मनाची ही अवस्था कोणाला कधी लाभेल हे काहीही सांगता येत नाही.

**प्र. 1. (इ)**

**(1)** (i) पिंपळाच्या झाडाचे देखणे रूप जे हृदयाला आनंद बहाल करते, त्यास दृष्टीचा पाडवा म्हटले आहे.

(ii) पिंपळाच्या झाडाची प्रत्येक डहाळी व प्रत्येक पान सौंदर्यानंदाने बहरलेले आहे.

**(2)**

(i) उताऱ्यात आलेल्या महिन्याचे नाव – चैत्र

(ii) बघत राहावे असे झाड – पिंपळ

(iii) साऱ्या झाडांच्या पालवीचा रंग – पोपटी

(iv) तापत चाललेले – ऊन

**प्र. 2. (अ)**

**(1)**

(i) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाकारलेली गोष्ट – मळवाट

(ii) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वागत करणारे – खाचखळगे

**(2)**

| पन्नास वर्षांपूर्वीची परिस्थिती | पन्नास वर्षांनंतरची परिस्थिती |
|---|---|
| (i) सूर्यफुलांनी पाठ फिरवली होती.<br>(ii) रणशिंग फुंकले होते.<br>(iii) चवदार तळ्याचे पाणी पेटले होते. | (i) सूर्यफुले ध्यास घेत आहेत.<br>(ii) आता बिगूल वाट पाहत आहे.<br>(iii) आता चवदार तळ्याचे पाणी थंड आहे. |

**(3)** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीडित जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध चवदार तळ्याचा संग्राम केला. अन्याय सहन करणाऱ्या मूक जनतेचे ते महानायक ठरले. बहिष्कृत असलेल्या, दबलेल्या समाजाला त्यांनी नवचैतन्य देऊन जागृत केले.

**(4)** अतिशय कठीण परिस्थितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी बॅरिस्टर ही पदवी संपादन केली. ते उच्चविद्याविभूषित होते. त्यांनी आपल्या अगाध ज्ञानाच्या बळावर इथल्या बहिष्कृत समाजाला अन्यायापासून मुक्त करण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य अंगीकारले. शोषित, पीडित व वर्णव्यवस्थेतून नाकारलेल्या, समृद्धीपासून वंचित असलेल्या जनतेला संघटित केले. त्यांनी 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा मूलमंत्र देऊन शोषित समाजाला आत्मविश्वास दिला. अन्यायाविरुद्ध लढा देण्यास प्रवृत्त केले. चवदार तळ्याचा संग्राम यशस्वी केला. समाजाला बोधितत्त्वाची शिकवण देऊन बौद्ध धर्म स्वीकारला. स्वतंत्र भारताचे संविधान लिहून भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, त्यांच्या अगाध कर्तृत्वाला मानवंदना देण्यासाठी 'भारतरत्न' हा सर्वोच्च बहुमान सन्मानाने बहाल करण्यात आला.

**प्र. 2. (आ)**

(1)

| उत्तमलक्षण |
|---|
| (i) कवितेचे कवी — संत रामदास |
| (ii) कवितेचा विषय — उत्तम माणसाची लक्षणे |
| (iii) कवितेतून मिळणारा संदेश — प्रत्येक व्यक्तीने चांगले वागण्याचाच प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी वाईट गुण कोणते व चांगले गुण कोणते हे स्पष्टपणे समजून घ्यावे. प्रत्येकाने उत्तम माणूस बनण्याचा प्रयत्न करावा. यातूनच चांगला व समर्थ समाज निर्माण होतो. |

(2)

| भरतवाक्य |
|---|
| (i) कवितेचे कवी — मोरोपंत |
| (ii) कवितेचा विषय — सज्जन माणसाचे महत्त्व |
| (iii) कवितेतून मिळणारा संदेश — नेहमी संतसज्जनांच्या संगतीत राहावे. त्यांच्या सहवासामुळे चांगले वागण्याचे दर्शन घडते. त्यांच्याप्रमाणे वागण्याची प्रेरणा मिळते. त्यांच्या विचारांसारखे विचार आपण अंगीकारू लागतो. तसेच नेहमी देवाचे नामस्मरण करीत राहावे. म्हणजे वाईट कल्पना, वाईट विचार आपल्या मनाला शिवत नाहीत. |

**प्र. 2. (इ)**

**आशयसौंदर्य :** कवयित्री नीरजा यांनी 'आश्वासक चित्र' या कवितेमधून स्त्री-पुरुष समानतेचे भविष्यकालीन चित्र आश्वासकरीत्या कसे साकारले जाईल, याची दिशा खेळणारा लहान मुलगा व मुलगी यांच्या प्रतीकांतून योग्यपणे दाखवली आहे.

**काव्यसौंदर्य :** भातुकलीतले जग हे स्वप्नाळू असते. त्यातला संसार हा लुटुपुटीचा असतो. मोठेपणी प्रत्यक्ष संसारातील जबाबदाऱ्या या वास्तववादी असतात. त्यामुळे भातुकलीच्या स्वप्नाळू जगातून प्रत्यक्ष वास्तवात प्रवेश करताना सत्य स्वीकारावे लागेल. स्त्री-पुरुष यांची परस्परांना स्नेहाची साथ असेल, तर समजूतदारपणाने व सहकार्याने ते जगात वावरतील. स्त्री-पुरुष परस्परांची कामे मिळून करतील, असे भविष्यकालीन आशावादी चित्र उपरोक्त ओळींतून साकारले आहे.

**भाषिक वैशिष्ट्ये :** या ओळींमधून लहान मुलांच्या खेळातून विचारगर्भ चिंतनाची प्रचीती येते. कवयित्रीने साध्या विधानातून विचारगर्भ आशय थेट मांडला आहे. 'स्त्री-पुरुष समानता' हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय सहजपणे व्यक्त झाला आहे. भविष्यकालीन दोघांमधील सामंजस्याचे लोभस परंतु प्रगल्भ चित्र 'हातात हात असेल' या वाक्यखंडातून प्रत्ययकारीरीत्या प्रकट झाले आहे. स्वप्न व सत्य यांची योग्य सांगड तरल शब्दांत व्यक्त झाली आहे.

**प्र. 3.**

**(1)** सबइन्स्पेक्टर रेखा मिश्रा यांचा जन्म उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. त्यांनी अलाहाबाद विद्यापीठातून इंग्रजी विषयात एम.ए. ही पदवी मिळवली. पुढे त्यांनी बी.एड. ही पदवीसुद्धा घेतली. रेल्वे पोलीस बोर्डाची प्रवेश परीक्षा देऊन सबइन्स्पेक्टर या पदावर दाखल झाल्या.

श्रीमती रेखा यांनी आपल्या नोकरीकडे केवळ नोकरी म्हणून पाहिले नाही. त्यांनी नोकरीकडे समाजकार्य म्हणून पाहिले आणि त्यांच्या कामाचे स्वरूप आमूलाग्र बदलले. विविध कारणांनी घराला दुरावलेल्या, भरकटलेल्या, चुकीच्या मार्गाला लागलेल्या, अवैध कामांना जुंपलेल्या मुलांची सोडवणूक करण्याकडे लक्ष केंद्रित केले. अवघ्या दीड वर्षांत त्यांनी ४३४ मुलांची सोडवणूक केली. हे फार मोठे सामाजिक कार्य त्यांनी पार पाडले.

**(2)** **व्युत्पत्ती कोशाचे कार्य :** व्युत्पत्ती म्हणजे एखादया शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखादया शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश !

व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते :

(1) मराठी भाषेतील – प्रमाण व बोली – शब्दांचे मूळ रूप दाखवणे.

(2) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चारात बदल होत असतो. हा शब्दाच्या उच्चारातील बदल व फरक दाखवणे.

(3) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात जे शब्दांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(4) भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळ्या कारणांनी शब्दांच्या अर्थांच्या अंगानेही बदल संभवतात. हे अर्थातील बदल स्पष्ट करणे.

**(3)** मातीत बीज पेरले की, मातीच्या कष्टमय मायेतून त्याचे झाड होते. माती त्या बीजाला सगळ्या नैसर्गिक संकटांपासून वाचवते. दुष्काळाशी लढते. बीजाची मायेने निगराणी करते. या सर्व प्रक्रियेतून बीजाचा वृक्ष होतो. त्याप्रमाणेच आजच्या मूल्यहीन समाजामध्ये चांगल्या संस्काराच्या मातीत जर माणसांना पेरले, तर त्यातून मानवतेचा निकोप वृक्ष उभा राहील, अशी आशादायक भावना या विधानातून व्यक्त झाली आहे. नवविचारांच्या नवसमाजात माणुसकीला बहर येईल आणि मानवजात सुखी होईल, असा सर्जनशील आशय 'माणूस पेरा! माणुसकी उगवेल!' या विधानातून व्यक्त होतो.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (i) इतरेतर द्वंद्व – आईवडील

(ii) वैकल्पिक द्वंद्व – दोनचार

(iii) समाहार द्वंद्व – खाणेपिणे

(iv) द्विगू – त्रिकोण

**(2)**

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| (i) महत्त्व | (i) निकामी | (i) घेईघेई |
| (ii) चढाई | (ii) सुकुमार | (ii) लुटूलुटू |

**(3)** (i) वाया जाणे – **अर्थ :** फुकट जाणे.

**वाक्य :** अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांची मेहनत वाया गेली.

(ii) गुडघे टेकणे – **अर्थ :** शरण येणे.

**वाक्य :** अखेर चोराने पोलिसांपुढे गुडघे टेकले.

(iii) खनपटीला बसणे – **अर्थ :** सारखे विचारत राहणे.

**वाक्य :** बाबा अभ्यासासाठी सुरेशच्या खनपटीला बसले.

(iv) निकाल लागणे – **अर्थ :** संपवणे.

**वाक्य :** बरीच वर्षे चाललेल्या खटल्याचा आज निकाल लागला.

**प्र. 4. (आ)**

**(1)** (1) (i) सुख – दु:ख (ii) स्तुती – निंदा

(2) (i) पूर्वज × वंशज (ii) शिस्त × बेशिस्त

(3) (i) पैसे – पैसा (ii) शिक्षक – शिक्षक

(4) फुलपाखराच्या → खरा, पारा

**(2)** (i) मला विश्वास आहे, खूप खूप शुभेच्छा!

(ii) तुमच्या शिक्षकांनी तुम्हांला वर्गात शिस्तीत बसलेलं बघितलंय.

**(3)** , → स्वल्पविराम   " " → दुहेरी अवतरण चिन्ह   ! → उद्गारचिन्ह

**(4)** (i) Mortgage – गहाण/तारण

(ii) Medical Examination – वैद्यकीय तपासणी

**प्र. 5. (अ), (आ) व (इ)...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदानपद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी **'नवनीत मराठी प्रथम भाषा उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'** या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.